# प्रकरण सहावे

# निष्कर्ष व शिफारशी

**विभाग 'अ' :निष्कर्ष.**

६.०१ प्रास्ताविक.

६.०२ मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक माहितीविषयी निष्कर्ष.

६.०३ माध्यमिक शाळांच्या माहितीसंबंधी निष्कर्ष.

६.०४ कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर विषयक निष्कर्ष.

६.०५ माध्यमिक शाळांच्या शिक्षकांविषयी निष्कर्ष.

६.०६ विद्यार्थ्यांविषयी निष्कर्ष.

६.०७ भौतिक सुविधा व शालेय परीसर याविषयी निष्कर्ष.

६.०८ शिक्षण विस्ताराधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीद्वारे काढलेले निष्कर्ष .

६.०९ गटशिक्षणाध्किारी यांच्या मुलाखतीतून मिळलेल्या माहितीद्वारे काढलेले निष्कर्ष.

६.१० उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखतीतून मिळालेल्या माहितीद्वारे काढलेले निष्कर्ष.

६.११ शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्याकडून मिळालेल्या माहितीद्वारे काढलेले निष्कर्ष.

६.१२ माध्यमिक शाळांना दिलेल्या भेटी व निरीक्षणातील निष्कर्ष.

**विभाग 'ब': शिफारशी.**

६.१३ मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक माहिती विषयी शिफारशी.

६.१४ माध्यमिक शाळांच्या माहिती संबंधी शिफारशी.

६.१५ कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तरविषय शिफारशी.

६.१६ माध्यमिक शाळेतील शिक्षकांविषयी शिफारशी.

६.१७ विद्यार्थ्यांविषयी शिफारशी.

६.१८ भौतिक सुविधा व शालेय परिसर विषयक शिफारशी.

६.१९ शिक्षण विस्ताराधिकारी संदर्भातील शिफारशी.

६.२० गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीतील माहिती विषयक शिफारशी.

६.२१ उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या बाबतीत शिफारशी.

६.२२ शिक्षणाधिकारी यांच्या विषयक शिफारशी.

**विभाग 'क' : पुढील संशोधनासाठी विषय.**

६.२३ प्राथमिक शाळांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

६.२४ कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

६.२५ वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

६.२६ विना-अनुदानीत माध्यमिक शाळांचा प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

६.२७ निवासी आश्रम शाळेच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

६.२८ नगर परिषद/महानगर पालिका शाळांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

६.२९ + २ स्तरावरील व्यवसाय शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

# प्रकरण सहावे
# निष्कर्ष आणि शिफारशी.
## विभाग "अ"
## निष्कर्ष.

### ६.०१ - प्रास्ताविक.

संशोधनाच्या प्रकरण क्र. १ ते ४ मध्ये माध्यमिक शाळांच्या प्रशासनाचा आढावा घेण्यात आलेला आहे. वरील प्रकरणे तात्विक स्वरूपाची आहेत. प्रकरण क्र. ५ मध्ये माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, माध्यमिक शिक्षण विभागातील विस्ताराधिकारी, उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी व तालुका पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीचे तसेच निवडक माध्यमिक शाळांना संशोधकाने दिलेल्या प्रत्यक्ष भेटीतून व शाळांच्या केलेल्या निरीक्षणातून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व विशदीकरण करण्यात आलेले आहे. पाचव्या प्रकरणाच्या आधारे प्रस्तुत प्रकरणात संशोधनाचे निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय सुचविण्यात आलेले आहेत.

### ६.०२ - मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक माहितीविषयी निष्कर्ष.

१. लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांच्या मुख्यध्यापकात बी.ए.,बी.एड्. अशी शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण ४७.५० % आहे.

२. एम्.ए.,बी.एड्. मुख्याध्यापकांचे प्रमाण ०९ % आहे.

३. बी.एस्सी.,बी.एड्. मुख्याध्यापकांचे प्रमाण ३२.५० % आहे.

४. एम्.एस्सी.,बी.एड् मुख्याध्यापकांचे प्रमाण ०२.०० % आहे.

५. एम्.एड्. असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण ०३.०० % आहे.

६. बी.पी.,एड्. ही व्यावसायिक पात्रता असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण ०६.००%आहे.

७. ०८.५० % मुख्याध्यापक प्रभारी मुख्याध्यापक आहेत.

८. ९१.५० % मुख्याध्यापक कायम मुख्याध्यापक आहेत.

९. तीन वर्षांपर्यंत प्रशासनाचा अनुभव असणारे २०.५० % मुख्याध्यापक आहेत.

१०. १२ % मुख्याध्यापकांना पाच वर्षांपर्यंतचा प्रशासनाचा अनुभव आहे.

११. ३६ % मुख्याध्यापकांना आठ वर्षांपर्यंतचा प्रशासनाचा अनुभव आहे.

१२. ३१.५० % मुख्याध्यापकांना प्रशासनाचा अनुभव आठ वर्षांपेक्षा अधिक आहे.

**६.०३- माध्यमिक शाळांच्या माहितीसंबंधी निष्कर्ष.**

१. लातूर जिल्ह्यातील ४०.५० % शाळा शहरी भागात मोडतात.

२. ग्रमीण भागात असलेल्या माध्यमिक शाळांचे प्रमाण ५९.५० % आहे.

३. लातूर जिल्ह्यात फक्त मुलांसाठी स्वतंत्र माध्यमिक शाळा अस्तित्वात नाही.

४. जिल्ह्यात मुलींच्या स्वतंत्र माध्यमिक शाळांचे प्रमाण ३.५० % आहे.

५. मुला- मुलींच्या मिश्र शाळांचे प्रमाण ९६.५० % आहे.

६. पुर्णतः अनुदानीत माध्यमिक शाळांचे प्रमाण ७३.५० % आहे.

७. विना-अनुदानीत शाळांचे प्रमाण ०२.५० % आहे.

८. अंशतः अनुदानीत शाळांचे प्रमाण १५.५० % आहे.

९. कायम विना-अनुदानीत शाळांचे प्रमाण ०८.५० % आहे.

१०. लातूर जिल्ह्यात स्त्री शिक्षिकांचे प्रमाण ११.६८ % आहे.

११. पुरूष शिक्षकांचे प्रमाण ८८.३२ % आहे.

१२. शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यात ०२.६० % स्त्रिया आहेत.

१३. शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यात ९७.४० % पुरूष आहेत.

१४ ५ ते १० अशा माध्यमिक शाळांची संख्या जिल्ह्यात ३८.५०% आहे.

१५. ८ ते १० अशा माध्यमिक शाळांची संख्या जिल्ह्यात ३३.५०% आहे.

१६. ५ ते १२ अशा माध्यमिक शाळांची संख्या जिल्ह्यात ०९.५०% आहे.

१७. ८ ते १२ अशा माध्यमिक शाळांची संख्या जिल्ह्यात १८.५०% आहे.

**६.०४ - कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर विषयक निष्कर्ष.**

१. जिल्ह्यात ८९.५० % शाळांत कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका भरलेल्या आहेत.

२. १०.५० % शाळांत कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका भरलेल्या नाहीत.

३. १०० % माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांना आवश्यक असे दप्तर पुरविले जाते.

४. १०० % माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची दैनंदिन हजेरी घेतली जाते.

५. १०० % माध्यमिक शाळांमधून गैरहजर विद्यार्थ्यांच्या पालकांशी संपर्क केला जातो.

६. ४४ % पालक शाळेच्या पत्रव्यवहारास योग्य व अनुकुल प्रतिसाद देतात.

७. ०३.५० % पालक शाळांच्या पत्रव्यवहारास प्रतिसाद देत नाहीत.

८. ५२.५० % पालकांचा शाळेच्या पत्रव्यवहारास संमिश्र प्रतिसाद आहे.

९. महिनाअखेरीस १०० % माध्यमिक शाळांतील शिक्षक विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवरती मुख्याध्यापकांची स्वाक्षरी घेतात.

१०. ९५.५० % शाळांमध्ये शिक्षक, वेळापत्रक व वार्षिक नियोजन विहित नमुन्यात ठेवतात.

११. ०४.५० % शाळांमध्ये शिक्षक वेळापत्रक व वार्षिक नियोजन विहित नमुन्यात ठेवत नाहीत.

१२. ५३ % माध्यमिक शाळांना स्वतंत्र ग्रंथालय नाही.

१३. ४७ % माध्यमिक शाळांना स्वतंत्र ग्रंथालय आहे.

१४. ०२.५० % शाळांमध्ये पूर्णवेळ ग्रंथपाल कार्यरत आहे.

१५. १३.५० % शाळांमध्ये अर्धवेळ ग्रंथपाल कार्यरत आहे.

१६. ८४ % शाळांमध्ये ग्रंथालयाचा कार्यभार विषय शिक्षकांकडे सोपविण्यात आलेला आहे.

१७. ९८.५० % शाळा मासिके, क्रमिक पुस्तके, परिपत्रके, संदर्भ ग्रंथ इ. च्या स्वतंत्र नोंदी ठेवतात. तर ०१.५० % या नोंदी स्वतंत्र स्वरूपात ठेवत नाहीत.

१८. १०० % माध्यमिक शाळांमध्ये तपासणी अधिकाऱ्यासाठी स्वतंत्र नोंदवही आहे.

१९. ८३.५० % मुख्याध्यापकांना शालेय तपासणी पथकात विषयनिहाय तज्ञ शिक्षक असतात असे वाटते. १६.५० % मुख्याध्यापकांना शालेय तपासणी पथकात विषयनिहाय तज्ञ शिक्षक नसतात असे वाटते.

२०. ६३.५० % मुख्याध्यापकांच्या मते शालेय तपासणी वस्तूनिष्ठ स्वरूपात होते. ३६.५० % मुख्याध्यापकांना शालेय तपासणी वस्तूनिष्ठ स्वरूपात होत नसल्याचे वाटते.

२१. १०० % माध्यमिक शाळांमधून विद्यार्थ्यांच्या दाखल्यावरील नोंदी बरोबर असल्याची मुख्याध्यापक खात्री करून घेतात.

२२. ४२.५० % माध्यमिक शाळांमधून शालेय व्यवस्थापन समितीची बैठक वर्षातून

दोन वेळा आयोजित केली जाते. ११ % माध्यमिक शाळांमधून शालेय व्यवस्थापन समितीची बैठक वर्षातून एक वेळा आयोजित केली जाते. शालेय व्यवस्थापन समितीची बैठक प्रसंगानुसार व नियमानुसार आयोजित करणाऱ्या शाळांचे प्रमाण ४६.५० % आहे.

२३. जिल्ह्यात १०० % माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक - पालक संघ कार्यन्वीत आहे.

२४. ८१.५० % शाळा शिक्षक पालक-संघाच्या बैठकींच्या अहवालाची नोंद ठेवतात. १८.५० % शाळा शिक्षक-पालक संघाच्या बैठकींच्या अहवालाची नोंद ठेव्त नाहीत.

२५. ३०.५० % मुख्याध्यापकांना शासनाकडून मिळणारे वेतनेतर अनुदान पुरेसे आहे असे वाटते. ६९.५० % मुख्याध्यापकांना शासनाकडून मिळणारे वेतनेतर अनुदान पुरेसे नाही असे वाटते.

**६.०५ - माध्यमिक शाळांच्या शिक्षकांविषयी निष्कर्ष.**

१. लातूर जिल्ह्यातील १०० % माध्यमिक शाळांमध्ये विषयनिहाय सर्व शिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

२. १०० % माध्यमिक शाळांमध्ये दैनिक पाठ अध्यापनाचे टाचण काढले जाते.

३. ८५.५० % माध्यमिक शाळांमधील मुख्याध्यापक वर्गशिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण करतात. १४.५० % माध्यमिक शाळांमधील मुख्याध्यापक वर्गशिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण करत नाहीत.

४. ८५.५० % शाळांचे मुख्याध्यापक वर्गशिक्षकांच्या पाठांचे निरीक्षण करत असताना विषयाची तयारी लक्षात घेतात. ९० % शाळांचे मुख्याध्यापक विषय ज्ञान लक्षात घेतात. ८०.५० % मुख्याध्यापक अध्यापन शैली लक्षात घेतात. ४६ % मुख्याध्यापक प्रश्नपध्दती लक्षात घेतात. ३१ % मुख्याध्यापक विद्यार्थ्यांचा पाठात सहभाग लक्षात घेतात. १०० % मुख्याध्यापक अध्यापकाचे पाठ टाचण तपासतात. ६५.५० % मुख्याध्यापक फलक लेखन विचारात घेतात. ७०.५० % मुख्याध्यापक गृहपाठ विचारात घेतात. ६४.५० % मुख्याध्यापक पाठाचे मूल्यमापन महत्त्वाचे मानतात.

५. ६८.५० % मुख्याध्यापक शिक्षकांसाठी स्वतः नमूना पाठ घेतात. ३१.५० % मुख्याध्यापक नमूना पाठ घेत नाहीत.

६. ९३.५० % माध्यमिक शाळांमधून दैनंदिन अध्यापनाच्या वेळी शिक्षक शैक्षणिक साहित्यांचा वापर करतात. ०६.५० % माध्यमिक शाळांमधून दैनंदिन अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर केला जात नाही.

७. १०० % माध्यमिक शाळांमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी जादा तासिका घेतल्या जातात.

८. १०० % माध्यमिक शाळांच्या मुख्यध्यापकांना असे वाटते की, शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या सेवांतर्गत प्रशिक्षणांची गरज आहे.

**६.०६ विद्यार्थ्यांविषयी निष्कर्ष.**

१. लातूर जिल्ह्यातील १०० % माध्यमिक शाळांमधून विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातात.

२. जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी खालील उपक्रम राबविले जातात. कंसातील अंक प्रतिसादकांची संख्या (वारंवारीता) दर्शवितात.

अ) निसर्ग शाळा (३३)

ब) संस्कृतिक कार्यक्रम (२००)

क) शैक्षणिक सहली (११)

ड) विविध स्पर्धा (१६१)

३. माध्यमिक शाळांमधून उशीरा येणाऱ्या व गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत पुढील कार्यवाही केली जाते. कंसातील अंक प्रतिसादकांची संख्या (वारंवारीता) दर्शवितात.

अ) पालक संपर्क (१७९)

ब) विद्यार्थ्यांना समजावून सांगणे (११०)

क) सौम्य शिक्षा (१९१)

४. विद्यार्थ्यामध्ये सामाजिक जाणिव निर्माण करण्यासाठी पुढील उपक्रम राबविले जातात. कंसातील अंक प्रतिसादकांची संख्या (वारंवारीता) दर्शवितात.

अ) वृक्षारोपन व वृक्षदिंडी (१७९)

ब) प्रसांगिक मदत फेरी (९१)

क) अंधश्रध्दा निर्मूलन (८२)

ड) ग्राम स्वच्छता (१६७)

इ) समाज जागृती अभियान (१३२)

५. जिल्ह्यातील ४०.५० % विद्यार्थी जिल्हास्तरीय विज्ञान मंच/विज्ञान मेळावे यात सहभाग घेतात. ५९.५० % विद्यार्थी जिल्हास्तरीय विज्ञान मंच /विज्ञान मेळावे यात सहभाग घेत नाहीत.

६. विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर स्पर्धा व शुध्द लेखन स्पर्धा आयोजित करणाऱ्या शाळांचे प्रमाण १०० % आहे. वक्तृत व वादविवाद स्पर्धा आयोजित करणाऱ्या शाळांमध्ये प्रमाण ६०.५० % आहे. विज्ञान उपक्रम निर्मिती स्पर्धा घेणाऱ्या शाळांचे प्रमाण ३३.५० % आहे.

७. ५६.५० % शाळांमधून विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून एक वेळा केली जाते. ४३.५० % शाळांमधून विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून दोन वेळा केली जाते.

**६.०७ - भौतिक सुविधा व शालेय परीसर याविषयी निष्कर्ष.**

१. लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांच्या इमारतीचे प्रमाण पुढील प्रमाणे असल्याचे स्पष्ट केले.

अ) पक्की - ५०.५० %

ब) अर्धी पक्की - ३१.०० %

क) कच्ची - १४.५० %

ड) टीन शेड - ०४.०० %

फ) इमारत नाही - ००.०० %

२. प्रतिसादक मुख्याध्यापकांनी दिलेल्या माहितीवरून माध्यमिक शाळांच्या इमारतीची मालकी खालील प्रमाणे आहे हे स्पष्ट होते.

अ) संस्थेची स्वतःची - ९०.५० %

ब) भाड्याची - ०९.५० %

३. जिल्ह्यातील ८९.५० % शाळांना पुरेशा वर्गखोल्या उपलब्ध आहेत.

४. १०.५० % शाळांना पुरेशा वर्गखोल्या उपलब्ध नाहीत.

५. ८६.५० % शाळांमध्ये पुरेसे फर्निचर उपलब्ध आहे.

६. १३.५० % शाळांमध्ये फर्निचर कमी असल्याचे स्पष्ट होते.

७. लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था पुढील प्रमाणे आहे.

अ) हातपंप - २२.५० %

ब) बोअर - ४३.०० %

क) विहिर - ०१.५० %

ड) नळ योजना - २३.०० %

इ) इतर - १०.०० %

फ) काहीही सोय नाही - ००.०० %

८. ८३.५० % शाळांमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र कक्ष आहे.

९. १६.५० % शाळांमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र कक्ष नसल्याचे स्पष्ट होते.

१०. १०० % माध्यमिक शाळांमध्ये मुख्याध्यापकांनी स्वतंत्र कक्ष आहे.

११. जिल्ह्यातील माध्यमिक शाळांकडे पुढील शैक्षणिक साधनांची उपलब्धता आहे.

अ) दूरदर्शन संच - ३५.५० %

ब) रेडिओ - १३.०० %

क) टेप रेकॉर्डर - ६६.०० %

ड) गणित/भूमिती साहित्य - १००.०० %

इ) विज्ञान प्रयोग शाळा साहित्य - १००.०० %

फ) क्रीडा साहित्य - १००.०० %

ग) भूगोल साहित्य - १००.०० %

ह) इतर - ४६.५० %

१२. लातूर जिल्ह्यातील १०० % माध्यमिक शाळांना क्रीडांगण उपलब्ध आहे.

**६.०८ - शिक्षण विस्ताराधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीद्वारे काढलेले निष्कर्ष .**

१. लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता पुढील प्रमाणे आहे.

अ) बी.एस्सी., बी.एड्. - २५.०० %

ब) बी. एस्सी., एम. एड्. - २५.०० %

क) एम.एस्सी., बी. एड्. - २५.०० %

ड) एम. ए., एम. एड्. - २५.०० %

२. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील ७५.०० % शिक्षण विस्ताराधिकाऱ्याच्या मते शाळा तपासणीचे वार्षिक उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे. २५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांच्या मते असे उद्दिष्ट ठरवून दिलेले नाही.

३. ५० % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना असे वाटते की, शाळां तपासणीचे वार्षिक उद्दिष्ट पूर्ण होते.

४. शिक्षण विस्ताराधिकारी तपासणी पथकाबरोबर शालेय तपासणी करतात.

५. १०० % विस्ताराधिकाऱ्यांना शालेय तपासणीत विषयनिहाय शिक्षकांची तपासणी केली जाते असे वाटते.

६. १०० % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना असे वाटते की, शालेय तपासणी पथकात विषयनिहाय तज्ञ शिक्षकांचा समावेश असतो.

७. १०० % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांच्या मते शाळा तपासणीनंतर शाळा तपासणीचा अहवाल संबंधित शाळेला दिला जातो.

८. १०० % शिक्षण विस्ताराधिकारी शाळा तपासणीनंतर सर्व शिक्षकांना एकत्रीत बोलावून त्यांना मार्गदर्शन करतात.

९. शाळा तपासणीत आढळून आलेल्या त्रूटींची पूर्तता करण्यासाठी शाळांना अवधी दिला जातो.

१०. प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीवरून शालेय तपासणीत ते खालील बाबींची तपासणी करत असल्याचे स्पष्ट होते.

अ) जनरल रजिस्टर नोंदी .

ब) नियोजन.

क) सेवा पुस्तिका.

ड) गोषवारा.

११. शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांकडून कार्यालयीन तपासणी व शैक्षणिक तपासणी एकाच वेळी केली जाते.

१२. शिक्षण विस्ताराधिकारी शालेय तपासणीत खालील अभिलेखांची तपासणी करतात.

अ) प्रवेश निर्गम रजिस्टर.

ब) कर्मचाऱ्यांची वैयक्तिक फाईल.

क) कॅश बुक.

ड) सी.ए. रिपोर्ट.

इ) कीर्द.

फ) विभागवार रजिस्टर

ग) बुक बँक.

ह) इ.बी.सी.

१३. ७५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना शिक्षक मान्यता देण्याच्या संदर्भात आपले कर्तव्ये नाही असे वाटते. २५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना शिक्षक मान्यता देण्याच्या संदर्भात आपले कर्तव्य आहे असे वाटते.

१४. शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना महिनाभरात किती शाळांची तपासणी करावी हे उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे.

१५. शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना आठवड्यातील सोमवार या दिवशी मुख्यालयात थांबणे हे बंधनकारक आहे.

१६. २५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना शाळा तपासणीसाठीचा कालावधी पूरेसा वाटतो तर ७५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना हा कालावधी अपुरा वाटतो.

१७. ७५ % शिक्षण विस्ताराधिकारी विद्यार्थी प्रवेश नियमानुसार झाल्याची तपासणी करतात. २५ % शिक्षण विस्ताराधिकारी अशी तपासणी करत नाहीत.

१८. माध्यमिक शाळा संहिता ५६.०४ नुसार देण्यात आलेले प्रवेश ५० % शिक्षण विस्ताराधिकारी कार्यभारासाठी मान्य करतात. ५०% शिक्षण विस्ताराधिकारी असे प्रवेश कार्यभारासाठी मान्य करत नाहीत.

१९. लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी खालील उपक्रम राबविले जातात.

अ) विज्ञान मंच.

ब) विज्ञान मेळावे.

क) राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा.

ड) शिष्यवृत्ती परीक्षा.

इ ) वाणिज्य प्रमाण पत्र परीक्षा.

फ) चित्रकला परीक्षा.

ग) निवोदय प्रवेश परीक्षा.

२०. ५० % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना नविन शाळा मान्यते संदर्भात आपली शिफारस गरजेची वाटते. ५० % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना ती गरजेची वाटत नाही.

२१. ७५ % शिक्षण विस्ताराधिकारी शाळांना मिळालेले वेतनेतर अनुदान नियमानुसार दिले गेले आहे किंवा नाही याची खात्री करतात. २५ % शिक्षण विस्ताराधिकारी अशी खात्री करत नाहीत.

२२. प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीवरून विद्यार्थ्यांच्या बाबतीत ते खालील अभिलेखे तपासत असल्याचे स्पष्ट होते.

अ) प्रवेश निर्गम.

ब) विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती.

क) परीक्षा रजिस्टर.

ड) गृहकार्याच्या नोंदी.

इ) आरोग्य तपासणी.

२३. ७५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना शाळांना मिळणारे वेतनेतर अनुदान शाळा योग्य बाबींवर खर्च करत नसल्याचे वाटते. २५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना असे अनुदान शाळा योग्य बाबींवर खर्च करत असल्याचे वाटते.

२४. १०० % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना माध्यमिक शाळांसाठी शालेय समितीची गरज आहे असे वाटते.

२५. १०० % शिक्षण विस्ताराधिकारी शाळा तपासणीत शाळांनी दिलेली माहिती सत्य असल्याची खात्री करून घेतात.

२६. १०० % शिक्षण विस्ताराधिकारी शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांना मार्गदर्शन करतात.

२७. शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाची सोय आहे.

२८. लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना असणारा कार्यभार जास्त आहे.

### ६.०९ - गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीतून मिळलेल्या माहितीद्वारे काढलेले निष्कर्ष.

१. गटशिक्षणाधिकाऱ्यांना माध्यमिक शाळांच्या बाबतीत शालेय तपासणी, मंडळ मान्यता वर्धित करणे, पटपडताळणी व मंडळ परीक्षा नियंत्रण इ. कामे आहेत.

२. गटशिक्षणाधिकारी हे माध्यमिक शाळांची तपासणी करतात.

३. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी जिल्हा पातळीवर विविध स्पर्धा व उपक्रम राबविले जातात.

४. गटशिक्षणाधिकारी शाळांचा आर्थिक कारभार तपासतात.

५. जिल्ह्यातील ५० % माध्यमिक शाळांच्या इमारती कच्च्या स्वरूपाच्या आहेत.

६. गटशिक्षणाधिकाऱ्यांना शाळा तपासणीचे वार्षिक उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे व ते त्यांच्याकडून पूर्ण होते.

७. शाळा तपासणीनंतर विषयनिहाय शिक्षकांना मार्गदर्शन केले जाते.

८. कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीस मान्यता देण्याचे अधिकार गटशिक्षणाधिकाऱ्यांना नाहीत.

९. मुख्याध्यापकांची नेमणूक सेवा जेष्ठतेनुसार करणे आवश्यक आहे.

१०. गटशिक्षणाधिकाऱ्यांना माध्यमिक शिक्षण विभागामार्फता आयोजित केलेल्या विविध बैठकांना हजर राहवे लागते.

### ६.१० - उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखतीतून मिळालेल्या माहितीद्वारे काढलेले निष्कर्ष.

१. लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या उपशिक्षणाधिकाऱ्यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता बी.ए.,बी,एड्. व एम. एस्सी., बी.एड्. अशी आहे.

२. दोन्ही उपशिक्षणाधिकाऱ्यांस प्रशासनाचा अनुभव दहा वर्षापेक्षा जास्त आहे.

३. उपशिक्षणाधिकारी यांच्या कर्तव्याबाबत लिखीत स्वरूपात नोंद उपलब्ध आहे.

४. शालेय तपासणीत उपशिक्षणाधिकारी खालील अभिलेखे तपासतात.

अ) प्रवेश फॉर्म.

ब) टी.सी. बुक.

क) शिक्षक हजेरी.

ड) विद्यार्थी हजेरी.

इ) लॉक बुक.

फ) स्टॉक रजिस्टर.

ग) सेवा पुस्तिका.

ह) कॅश बुक.

ई) आरोग्य तपासणी अहवाल.

ज) शालेय पोषण आहार.

ल) वार्षिक निकाल.

म) उत्तर पत्रिका.

न) शिक्षक-पालक संघ.

५. शाळा तपासणीचे उद्दिष्ट उपशिक्षणाधिकाऱ्यांस ठरवून दिलेले आहे.

६. आठवड्यातील दोन दिवस (सोमवार, मंगळवार) उपशिक्षणाधिकाऱ्यांस मुख्यालयात थांबणे बंधनकारक आहे.

७. जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक-पालक संघ अस्तित्वात आहे व कार्यान्वित आहे.

८. सर्व शाळा वेतनेतर अनुदान योग्य बाबींवर खर्च करतात.

९. शाळा न्यायाधिकरणाच्या प्रकरणात उपशिक्षणाधिकाऱ्यांना पार्टी करत नाहीत.

१०. शाळा न्यायाधिकरण हे स्वतंत्र आहे, हे योग्य आहे.

११. विद्यार्थ्यांच्या बाबतीत माध्यमिक शाळांमध्ये खालील अभिलेखे असतात.

अ) आरोग्य तपासणी.

ब) दैनिक उपस्थिती.

क) शालेय पोषण आहार.

१२. विद्यार्थ्यांसाठी माध्यमिक शिक्षण विभागामार्फत खालील स्पर्धा /परीक्षा घेतल्या जातात.

अ) एन.टी.एस.

ब) चित्रकला.

क) विज्ञान मेळावे/विज्ञान मंच.

ड) नवोदय विद्यालय परीक्षा.

१३. जिल्हा परिषदेमार्फत मुख्याध्यापकांसाठी उपाबोधन वर्गाचे आयोजन केले जाते.

१४. उपशिक्षणाधिकारी हे नियमानुसार व सेवा जेष्ठतेनुसार शिक्षकांची प्रशिक्षणासाठी निवड करून ती यादी वरीष्ठांकडे कार्यवाहीसाठी सादर करतात.

१५. जिल्ह्यातील माध्यमिक शाळांची संख्या (४७४) लक्षात घेवून उपशिक्षणाधिकारी व विस्ताराधिकारी यांच्या संख्येत वाढ करणे गरजेचे आहे.

१६. माध्यमिक शिक्षण विभागात राज्य शासनाचे कर्मचारी नाहीत.

१७. माहितीच्या अधिकारामुळे कार्यालयीन कामकाजात दिरंगाई होते.

१८. लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागास स्वतंत्र इमारत व जागा नाही.

**६.११ - शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्याकडून मिळालेल्या माहितीद्वारे काढलेले निष्कर्ष.**

१. जिल्हा परिषदेकडून चालविल्या जाणाऱ्या शाळांमध्ये शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या नेमणूका गरजेप्रमाणे व वेळेत होतात. अशा नेमणूका गरजेप्रमाणे व वेळ्त नाही झाल्यास त्याचा शाळांतर्गत प्रशासनावर परिणाम होतो.

२. मुख्याध्यापकांच्या नेमणूका खूप विलंबाने अथवा काहीशा विलंबाने होत असल्यास त्याचा शालेय व्यवस्थापणावर परिणाम होतो.

३. जिल्हा परिषदेमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांच्या बाबतीत शालेय व्यवस्थापन समितीवरील सदस्यांची निवड त्या त्या शाळांचे मुख्याध्यापक करतात.

४. शालेय व्यवस्थापन समितीवरील सदस्य काही अंशी शालेय जगताचे ज्ञान व भान असलेले असतात.

५. माध्यमिक शाळा संहितेमध्ये नोंदविल्याप्रमाणे मुख्याध्यापकास व्यवस्थापनाचे स्वातंत्र्य मिळत नाही.

६. जिल्हा परिषद चालवित असलेल्या माध्यमिक शाळेत शिक्षक व शिक्षकेतर

कर्मचाऱ्यांच्या नेमणूका केल्यानंतर त्यांची परत वैयक्तिक मान्यता घ्यावी लागत नाही.

७. स्वंयसेवी संस्थानी चालविलेल्या माध्यमिक शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या मान्यता देण्यासाठी शिबिरांचे आयोजन गरजेनुसार व वरिष्ठांच्या परवागीने केले जाते.

८. संबंधित कालावधीत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मान्यतेची संपूर्ण प्रकरणे निकाली काढली जातात.

९. कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीनंतर मान्यता देत असताना जाहीरात, आरक्षण, नियुक्ती आदेश, ठराव, रूजू अहवाल, गरज, शैक्षणिक व व्यावसायिक कागदपत्रे, कोर्ट प्रकरणे, शाळेची सेवा जेष्ठता यादी इ. बाबी विचारात घेतल्या जातात.

१०. स्वयंसेवी संस्थांकडून होणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नेमणूकांबाबत शासकीय नियम, कायदे याबाबतची माहिती व परिपत्रके मुख्याध्यापकांना विलंबाने पण वेळोवेळी पुरविले जातात.

११. कर्मचाऱ्यांच्या योग्य नेमणूकांबाबात मुख्याध्यापकांसाठी शासनाकडून उद्‌बोधन वर्ग घेतले जातात.

१२. कर्मचाऱ्यांच्या नेमणूका व त्यांच्या मान्यता याबाबतीत शासनाकडून धरसोडपणा अथवा नियमात वारंवार बदल अशा बाबी घडतात.

१३. स्वयंसेवी संस्थानी केलेल्या कर्मचाऱ्यांच्या नेमणूका नियमानुसार नसतील तर प्रस्तावातील त्रूटींची पूर्तता करून कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीस मान्यता दिली जाते.

१४. शिक्षकांना व इतर कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देणे, वेतन वाढ रोखणे, कामावरून कमी करणे इ. अधिकार शिक्षणाधिकाऱ्यांस नाहीत.

१५. कर्मचाऱ्यास कामावरून कमी केल्यास, पदावनत केल्यास, कामावरून बडतर्फ केल्यास, निलंबन केल्यास शाळा न्यायाधिकरण याबाबतीत माहिती मागवते.

१६. शाळा न्यायाधिकरणाने शिक्षणाधिकाऱ्यास पाचारण केल्यास शिक्षणाधिकारी आपले म्हणणे प्रतिनिधिमार्फत सादर करू शकतात.

१७. शाळा न्यायाधिकारणाने मागविलेली माहिती मिळविण्यासाठी शिक्षणाधिकारी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, कार्यालयातील लिपिक व शिक्षण विस्ताराधिकारी यांची मदत घेतात.

१८. स्वयंसेवी संस्थानी आपल्या कर्मचाऱ्यांविरूध्द केलेल्या कार्यवाहीस शिक्षणाधिकारी यांची सहमती अथवा असहमती गरजेची असते.

१९. एखाद्या कर्नचाऱ्याचे प्रकरण न्यायप्रविष्ट असेल तर त्या जागी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यास न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून मान्यता दिली जाते.

२०. लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागात अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने शाळा तपासणीस विलंब होतो.

२१. वार्षिक तपासणीखेरीज चौकशी प्रकरणे, तक्रारी, पटपडताळणी, शाळेतील इतर कार्यक्रम, परीक्षा, कोर्ट प्रकरणे इ. बाबतीत शिक्षणाधिकारी शाळांना भेटी देतात.

२२. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळांचे अनुदान रोखण्याची कार्यवाही शिक्षणाधिकारी वरीष्ठांकडे प्रस्तावित करतात.

२३. दीर्घ मुदतीच्या रजेच्या काळातील वेतन दोनदा दिले जाण्याची समस्या आहे.

२४. कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस मान्यता देणे व त्यांना वेतन देणे या दोन्ही बाबी वेगवेगळ्या पथकाकडे असल्यातरीही दोन्हीं पथकाचे प्रमुख शिक्षणाधिकारी हेच आहेत.

२५. शाळेच्या इमारतीची भाडे निश्चिती बांधकाम विभागाच्या अभियंत्याकडून केली जाते.

२६. जिल्हा परिषदेच्या शाळा व स्वयंसेवी संस्थांच्या शाळा यांच्या सुट्ट्यांच्या संख्येत फरक नसतो.

२७. ठरवून दिलेली सुट्ट्यांची संख्या कायम ठेवून त्यात अदलाबदल करण्याच अधिकार मुख्याध्यापकांना आहे.

२८. अनुदानीत शाळा व विना-अनुदानीत शाळा अशा दोन्ही प्रकारच्या शाळांच्या बाबतीत शिक्षणाधिकारी यांची जबाबदारी व कर्तव्ये सारखीच आहेत.

२९. शिक्षणाधिकाऱ्यांना सेवांतर्गत प्रशिक्षण दिले जाते.

३०. विहित, योग्य व कायदेशीर कामे बेकायदेशीर करण्याबाबत शिक्षणाधिकाऱ्यांवर राजकीय दबाव येतो.

३१. उच्च माध्यमिक वर्गांचे प्रशासन जिल्हा परिषद पातळीवर स्वतंत्र असणे गरजेचे आहे.

### ६.१२ - माध्यमिक शाळांना दिलेल्या भेटी व निरीक्षणातील निष्कर्ष.

१. ५० % माध्यमिक शाळांच्या इमारती या कच्च्या स्वरूपाच्या आहेत.

२. शहरातील बहुतांश शाळा गजबजलेल्या परीसरात आहेत.

३. ग्रामीण भागातील ८० % शाळा गावापासून योग्य अंतरावर आहेत.

४. ९० % शाळांत शिक्षक व मुख्याध्यापक यांच्यासाठी स्वतंत्र कक्षाची सोय आहे.

५. ४० % शाळांमध्ये ग्रंथालय स्वतंत्र आहे.

६. ७० % माध्यमिक शाळांमध्ये पुरेसे क्रीडा साहित्य उपलब्ध आहे.

७. ९५ % शाळांत वर्गखोल्यांना स्वच्छ सूर्यप्रकाश व हवेसाठी खिडक्यांची सोय आहे.

८. ४० % शाळांत वर्गखोल्या स्वच्छ असल्याचे दिसून आले.

९. ७० % शाळांना खेळांसाठी क्रीडांगण पुरेसे आहे.

१०. ६० % शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी गणवेश आहे.

## विभाग "ब"

## शिफारशी

### ६.१३ - मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक माहिती विषयी शिफारशी.

१. माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता किमान द्वितीय श्रेणीतील पदव्यूत्तर पदवी आणि प्रशिक्षित अशी असावी.

२. प्रभारी मुख्याध्यापक नेमण्यात येऊ नयेत.

३. किमान पाच वर्ष शिक्षक म्हणून अनुभव असेल तरच मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात यावी.

### ६.१४ - माध्यमिक शाळांच्या माहिती संबंधी शिफारशी.

१. फक्त मुलींसाठीच्या माध्यमिक शाळांचे प्रमाण वाढविण्यात यावे.

२. माध्यमिक शाळांमध्ये स्त्री शिक्षकांची संख्या वाढविण्यात यावी.

३. माध्यमिक शाळांना मिळणारे वेतनेतर अनुदान वेळेवर देऊन त्यात वाढ करण्यात यावी.

४. माध्यमिक शाळांची स्थापना लोकसंख्येच्या प्रमाणात करण्यात यावी.

५. विना - अनुदानीत शाळा मान्यतेचे धोरण बंद करण्यात यावे.

६.१५ - कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तरविषय शिफारशी.

१. सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका अद्ययावत स्वरूपात ठेवण्यात आलेल्या असाव्यात.

२. वेळापत्रक व वार्षिक नियोजन सर्व शाळांमधून काटेकोरपणे ठेवलेले असावे.

३. ग्रंथपाल हे पद स्वतंत्र असावे.

४. तपासणी पथकात विषयनिहाय तज्ञ शिक्षकांचा समावेश असावा.

५. सर्व माध्यमिक शाळांमधून गैरहजर विद्यार्थ्यांच्या पालकांच्या भेटी घेतल्या जाव्यात.

६. सर्व शाळंमधून शिक्षक-पालक संघाच्या बैठकीच्या नोंदी घेतल्या जाव्यात.

७. गुणवत्ता वाढ व शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी शासनाच्या सर्व योजना सर्व शाळांमधून राबविल्या जाव्यात.

६.१६ - माध्यमिक शाळेतील शिक्षकांविषयी शिफारशी.

१. मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतील शिक्षकांच्या पाठांचे निरीक्षण करावे.

२. मुख्याध्यापकांनी शिक्षकांसाठी नमुना पाठ घ्यावा.

३. शिक्षकांनी दैनंदिन आध्यापनात शैक्षणिक साहित्यांचा वापर करावा.

४. पाठ निरीक्षणानंतर मुख्याध्यापकांनी अध्यापकांच्या अडचणी सोडविण्यासाठी मार्गदर्शन करावे.

५. अध्यापन कार्यात कमी पडणाऱ्या सर्व शिक्षकांना मुख्याध्यापकांनी तोंडी व लेखी सूचना द्याव्यात.

६. नियोजनाप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण करण्यात यावा.

७. शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी मुख्याध्यापकांनी प्रोत्साहन द्यावे.

६.१७ - विद्यार्थ्यांविषयी शिफारशी.

१. उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांची उशिरा येण्याची कारणे समजून घेवून योग्य ती शिक्षा करावी.

२. अभ्यासक्रमात मागे पडलेल्या व बौध्दिकदृष्ट्या कमी असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शिक्षक व मुख्याध्यापकांनी एकत्रिपणे प्रयत्न करावेत.

३. सर्व माध्यमिक शाळांमधून विद्यार्थ्यांसाठी निरनिराळ्या परीक्षांचे आयोजन केले जावे.

४. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणीव निर्माण होण्यासाठी त्यांचा जिल्हास्तरीय विज्ञान मंच व विज्ञान मेळावा यातील सहभाग वाढवावा.

५. वर्षातून दोन वेळा विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जावी.

६. विद्यार्थ्यांच्या बौध्दिक क्षमतेचा अभ्यास करून त्यांना स्पर्धापरीक्षांचे मार्गदर्शन करण्यात यावे.

**६.१८ - भौतिक सुविधा व शालेय परिसर विषयक शिफारशी.**

१. सर्व माध्यमिक शाळांच्या इमारती पक्क्या व स्वतंत्र असाव्यात.

२. सर्व माध्यमिक शाळांमध्ये वर्ग खोल्यांनी संख्या पुरेशी असावी.

३. सर्व माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्या प्रमाणात फर्निचर पुरेसे असावे.

४. सर्व माध्यमिक शाळांमध्ये संगणक व टेलिफोनची सोय असावी.

५. मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यासाठी स्वतंत्र कक्षाची सोय सर्वच माध्यमिक शाळांमध्ये असावी.

६. सर्व माध्यमिक शाळां इमारती, क्रिडांगण, बाग-बगीचा इ. बाबतीत परीपूर्ण असाव्यात.

**६.१९ - शिक्षण विस्ताराधिकारी संदर्भातील शिफारशी.**

१. शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांची शैक्षणिक पात्रता कमीत कमी द्वितीय श्रेणीतील पदव्यूतर पदवी व प्रशिक्षित अशी असावी.

२. प्रत्येकी ५० माध्यमिक शाळांमागे एक शिक्षण विस्ताराधिकारी नियुक्त केलेला असावा.

३. शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी शाळा तपासणीचे ठरवून दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे.

४. शालेय तपासणीत कार्यालयीन तपासणी व शैक्षणिक तपासणी एकाच दिवशी एकत्रीत करण्याऐवजी ती स्वतंत्रपणे करावी.

५. ठरवून दिलेल्या दिवशी मुख्यालयात थांबावे.

६. शासनाकडून मिळणाऱ्या वेतनेतर अनुदानाच्या योग्य खर्चाची खात्री करून घ्यावी.

७. शाळा तपासणीनंतर शाळेच्या गुणवता वाढीसाठी शालेय समितीबरोबर चर्चा करावी.

८. प्रत्येक शाळेची तपासणी वर्षातून किमान दोन वेळा करावी.

९. शाळेचा दर्जा सुधारण्याच्या संदर्भात भेटीच्या वेळी व तपासणीच्या वेळी दिलेल्या

सूचनांची कार्यवाही सर्व मुख्याध्यापकांकडून होते किंवा नाही याची पडताळणी पुढील तपासणीत करावी व योग्य ती कार्यवाही करावी.

१०. सर्व अभिलेखे काळजीपूर्वक तपासावेत. त्यात असणाऱ्या त्रुटी मुख्याध्यापकांच्या निर्दशनास आणून द्याव्यात. दुरूस्तीसाठी योग्य त्या सूचना द्याव्यात.

**६.२० - गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीतील माहिती विषयक शिफारशी.**

१. शाळा तपासणीत सर्व बाबींची तपासणी वस्तूनिष्ठपणे करण्यात यावी.

२ तालुकास्तरावर विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविण्याविषयी मुख्याध्यापकांना सूचना देण्यात याव्यात.

३. प्राथमिक शाळांबरोबरच माध्यमिक शाळांचे प्रशासनाकडेही लक्ष द्यावे.

४. शाळांचे आर्थिक व्यवहार काटेकारपणे तपासावेत.

५. तालुक्यातील माध्यमिक शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचविण्यासाठी तालुका पातळीवर विविध उपक्रमाचे आयोजन करावे.

**६.२१ - उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या बाबतीत शिफारशी.**

१. शालेय तपासणीत सर्व अभिलेखांची योग्य व काटेकोरपणे तपासणी करण्यात यावी.

२. शालेय तपासणीचे उद्दिष्ट साध्य करण्यात यावे.

३. ठरवून दिलेल्या दिवशी मुख्यालयात थांबावे.

४. शाळा तपासणी नंतर शाळेच्या प्रगतीची व त्रूटींची माहिती देण्यासाठी शालेय समितीची बैठक बोलविण्यात यावी.

५. शाळा तपासणीत वेतनेतर अनुदान व शाळेचा इतर खर्च याबाबी काटेकोरपणे तपासण्यात याव्यात.

६. माध्यमिक शिक्षण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी मुख्याध्यापकांना सूचना द्याव्यात.

७. जिल्हास्तरीय विज्ञान मंच/ विज्ञान मेळावे व विज्ञान उपक्रम निर्मिती स्पर्धा याबाबतीत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविण्याबाबत मुख्याध्यापकांना सूचना द्याव्यात.

८. माध्यमिक शिक्षण विभागात राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी.

९. लातूर जिल्हा परिषदेस स्वतंत्र जागा व इमारत उपलब्ध व्हावी.

६.२२ - **शिक्षणाधिकारी यांच्या विषयक शिफारशी.**

१. सर्व शाळा नियमानुसार सर्व अभिलेखे ठेवतात याची खात्री करावी.

२. शालेय तपासणी व्यतिरिक्त शाळांना अकस्मात भेटी देवून शाळांची तपासणी करावी.

३. शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यतेची प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढावीत.

४. कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस मान्यता देत असताना आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता झालेली आहे, याची खात्री करावी.

५. वर्षातून किमान दोन वेळा जिल्ह्यातील मुख्याध्यापकांच्या तालुकानिहाय सहविचारसभा आयोजित करून त्यांना मार्गदर्शन करावे.

६. सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका अद्ययावत स्वरूपात आहेत, याची तपासणी व खात्री करावी.

७. मुख्याध्यापकांना प्रशासनाचे स्वातंत्र्य मिळण्यासाठी शालेय समितीच्या सदस्यांबरोबर चर्चा करावी.

## विभाग "क"

## पुढील संशोधनासाठी विषय.

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करीत असताना संशोधकाच्या असे लक्षात आले की, 'शैक्षणिक प्रशासन' या विषयाची व्याप्ती अतिशय मोठी आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने फक्त माध्यमिक शिक्षण विभागाच्या जिल्हास्तरीय प्रशासनाचा अभ्यास केलेला आहे. शिक्षणाच्या वेगवेगळ्या स्तरावर प्रशासन काम करते. त्यामुळे सर्व स्तरावरील प्रशासनाचा अभ्यास होणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते.

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शिक्षणाचा अभ्यास अभिप्रेत असल्याने इतर स्तरावरील अभ्यास करणे संशोधकास शक्य झाले नाही. शैक्षणिक क्षेत्रातील प्रशासन प्रभावी होऊन शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रशानाच्या विविध स्तरांचा संशोधनात विचार झाला पाहिजे. त्यासाठी त्या स्तरावर संशोधन होणे गरजेचे आहे, असे संशोधकास वाटते. प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करीत असताना शैक्षणिक प्रशासनाच्या इतर विविध विषयावर पुढील काळात संशोधन करणे शक्य आहे, असे संशोधकाच्या निर्देशनास आले. ते विषय पुढील प्रमाणे.

## ६.२३ - प्राथमिक शाळांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

संपूर्ण शिक्षण प्रक्रियेत प्राथमिक शिक्षण हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. या काळात विद्यार्थ्यांच्या बालमनावर संस्कार घडविले जातात. त्यासाठी प्रत्येक बालक शाळेत जाणे व शिकणे ही देशाची गरज आहे. हे लक्षात घेवूनच आपल्या देशात प्राथमिक शिक्षण सक्तीचे, मोफत व सार्वत्रिक केले आहे, तरी देखील प्राथमिक शिक्षणाचा म्हणवा तेवढा विकास देशात झालेला नाही.

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाबरोबरच अभ्यासक्रमात व प्रशासनात अमुलाग्र बदल घडवून आणणे आवश्यक आहे. त्यासाठी नविन अभ्यासक्रम तयार करणे व त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक आहे. अंमलबजावणीचे बाबतीत प्रशासन हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे, म्हणून प्रशासनास येणाऱ्या अडचणी समजून घेण्यासाठी प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा सखोल अभ्यास करून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाय सूचविणे आवश्यक आहे असे संशोधकास वाटते.

## ६.२४ - कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

कोठारी आयोगाने सुचविलेल्या १० + २ + ३ या आकृती बंधानुसार + २ स्तरावरील वर्ग कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक विद्यालय या नावाने संबोधले जातात. हे वर्ग माध्यमिक शाळा किंवा वरिष्ठ महाविद्यालयांना जोडलेले असतात.

माध्यमिक शाळा व वरिष्ठ महाविद्यालय यांच्यासाठी कार्यभार, सुट्ट्यांचा कालावधी, रजेचा कालावधी इत्यादी बाबतीत फरक आहे. म्हणून ११ वी व १२ वी हे दोन वर्ग स्वतंत्र नसून ते माध्यमिक शाळा किंवा वरीष्ठ विद्यालयास जोडलेले असल्यामुळे त्यांच्या प्रशासनात अनेक समस्या निर्माण होतात. माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावर अध्यापन पध्दतीत फरक असल्याने तोच फरक + २ स्तरावर देखील जाणवतो. या स्तर जोडणीमुळे कांही ठिकाणी उच्च माध्यमिकचे प्रशासन मुख्याध्यापक चालवतात, तर काही ठिकाणी वरीष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य चालवितात.

उच्च माध्यमिक शाळांचे प्रशासन हे त्या स्तराला शिकविणाऱ्या शिक्षकांकडे नसल्यामुळे या स्तरावर अनुदान, सेवा शर्ती, तासिका कालावधी इ. महत्त्वाच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत.

त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास होणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते.

**६.२५ - वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.**

व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासासाठी वरीष्ठ महाविद्यालयाचा शिक्षणस्तर अधिक महत्त्वाचा आहे. वरीष्ठ महाविद्यालयीन शिक्षण समाजाच्या गरजा, अडचणी व दैनंदिन जीवन याबाबींशी निगडीत होणे गरजेचे आहे. या शिक्षणातून सामाजिक व राष्ट्रीय ऐक्य निर्माण झाले पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये नवीन आव्हानांना सामोरे जाण्याचे धैर्य निर्माण झाले पाहिजे. त्यासाठी वरीष्ठ महाविद्यालयाचे प्रशासन प्रभावी व दूरगामी स्वरूपाचे असले पाहिजे, म्हणून वरीष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास करून त्याच्या समस्या जाणून घेवून त्यावर उपाय सूचविणे गरजेचे आहे असे संशोधकास वाटते.

**६.२६ - विना-अनुदानीत माध्यमिक शाळांचा प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.**

शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसारासाठी शासन माध्यमिक शाळांना मोठ्या प्रमाणात मान्यता देत आहे. सर्व शाळांना सुरूवातीपासून अनुदान देण्याएवढी भक्कम आर्थिक परिस्थिती शासनाची नाही, म्हणून शासनाने नविन शाळांना टप्पाटप्याने अनुदान देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे अशा शाळांच्या अनुदानीत शाळांपेक्षा वेगळ्या स्वरूपाच्या समस्या आहेत. त्याचबरोबर नविन धोरणानुसार शासनाने कायम स्वरूपी विना-अनुदान तत्वावर माध्यमिक शाळांना मान्यता देण्याचे धोरण सुरू केले आहे.

अपुऱ्या अनुदानामुळे अनेक माध्यमिक शाळांत आर्थिक, शैक्षणिक व प्रशासकीय समस्या निर्माण झाल्या आहेत, त्यामुळे अशा शाळांचे प्रशासन कशाप्रकारे चालते, ते चालविताना कोणत्या समस्या निर्माण होतात. त्या समस्यांचा शोध घेणे व त्या सोडविण्यासाठी उपाय शोधणे गरजेचे आहे, म्हणून विना-अनुदान शाळांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास होणे गरजेचे आहे.

**६.२७ - निवासी आश्रम शाळेच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.**

मागासवर्गीय मुलांच्या शिक्षणासाठी तसेच भटक्या जाती जमातीच्या मुलांच्या शिक्षण विकासासाठी शासनाने निवासी आश्रम शाळांना मान्यता देणे सुरू केले आहे. अशा शाळांना मान्यतेपासूनच १०० % अनुदान असते, परंतु या शाळा निवासी सुरूपाच्या असतात.

या शाळा निवासी असल्याने या शाळांचे प्रशासन चालविणे ही मुख्याध्यापकांसाठी

मोठी कसरत आहे. ज्या उद्देशाने शासनाने या शाळा सुरू केल्या आहेत, तो उद्देश साध्य करण्यासाठी अशा शाळांच्या मुख्याध्यापकांना व एकूण प्रशासनाला कोणत्या अडचणी येतात त्यांचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचविणे गरजेचे आहे.

**६.२८ - नगर परिषद/महानगर पालिका शाळांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.**

शिक्षणाचे महत्त्व व वाढती मागणी लक्षात घेवून नगर परिषद व महानगर पालिका यांनी देखील शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली आहे. त्यामुळे अनेक शहरातून अशा शाळा कार्यरत आहेत. अशा शाळांचे प्रशासन हे स्वतंत्र असते, त्यामुळे या प्रशासनाचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

नगर परिषद व महानगरपालिका यांच्या शाळांची पाहणी केल्यानंतर असे लक्षात येते की, अशा शाळांचा दर्जा इतर शाळांच्या तुलनेत समाधानकारक नाही. त्यामुळे नगर परिषद/महानगर पालिका यांच्या शाळांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास करून त्यांच्या समस्या जाणून घेवून त्यावर उपाय सूचविणे गरजेचे आहे.

**६.२९ + २ स्तरावरील व्यवसाय शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.**

१९८६ च्या नविन धोरणानुसार + २ दोन स्तरावर व्यावसायिक शिक्षणाची सुरूवात करण्यात आली. उच्च माध्यमिक प्रमाणेच हे वर्ग माध्यमिक शाळांना किंवा वरिष्ठ महाविद्यालयाना जोडलेले आहे. परंतु या वर्गांचे प्रशासन हे स्वतंत्र व वेगळ्या स्वरुपाचे आहे.

या स्तरावर काम करणाऱ्या अध्यापकात शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेत, वेतन श्रेणीत व कार्यभारात फरक आहे. म्हणून या स्तरावरील प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास करून, प्रशासनाच्या समस्या जाणून घेवून त्यावर उपाय सूचविणे गरजेचे आहे असे संशोधकास वाटते.